INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

वर्गनिहाय महिला बचत गटांची शैक्षणिक स्थिती एक अभ्यास : संदर्भ पिंप्री राजाखूर्द

(Educational Status of Class Wise Women's Self Help Groups: Reference to Pimpri Rajakhurd)

धर्मराज माणिकराव जाधव
संशोधक विद्यार्थी,
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
E-mail: jadhavdharmraj5560@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/03.2023-73316224/IRJHIS2303011

प्रास्ताविक :

महिलांचा लोकसंख्येतील हिस्सा जवळपास अर्धा आहे. भारतात उत्पन्नाच्या दृष्टीने विचार केला तर स्त्री व पुरूष यांच्यात बरीच मोठी असमानता दिसून येते. महिलांना समाजात जीवन जगत असतांना भेदभाव पूर्ण अशा अनेक चालीरीती, रूढी, प्रथा, परंपरांना सामोरे जाऊन बंदिस्त स्वरूपात दिवस काढावे लागत आहेत. महिलांचा सामाजिक दर्जा व महिलांच्या समाजात आमूलाग्र क्रांती होणे आवश्यक आहे. कारण स्त्रीया आजही कोणत्याही परिवर्तनासाठी फारशा तप्तर दिसत नाहीत. स्त्री आणि समाज यांचा अन्योन्य संबंध असतो.[१] समाजातील मध्यवर्गीय दुर्बल घटकांचा आशेचा किरण म्हणून स्वयंसहाय्यता गटाकडे पाहीले जाते. महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी बचतगट एक वरदान ठरत आहे. महिला सबलीकरणाची गंगोत्री म्हणून जगभरात बचतगटाची चळवळ वेगवेगळ्या संकल्पनेतून साकार होत आहे. महिला स्वयंसहाय्यता बचत गटावर विविध व्यक्तींनी संशोधन केल्याचे दिसून येते. मात्र स्वयंसहाय्यता बचत गटात सहभागी असणाऱ्या महिलांच्या शैक्षणिक स्थितीचे अवलोकन केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तूत संशोधनात त्यावर भर देण्यात आला आहे.

बचत गट चळवळीचा उदय व विकास :

बचत गटाला सर्वप्रथम बांग्लादेशामध्ये सूरूवात झाली. बांग्लादेशातील चित्तगाव विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्रा.डॉ. महंमद यूनूस यांनी खऱ्या अर्थाने बचत गट चळवळीला सूरूवात केली. डॉ. यूनूस यांनी स्वयंसहाय्यता गटाद्वारे सूक्ष्म वित्त हा गरिबी वरचा उपाय शोधून काढला. गरिबीवर सुक्ष्म वित्त यामूळे मात करता येते हे संबंध जगाला दाखवून दिले. म्हणून महंमद यूनूस यांना स्वयंसहाय्यता गटाचा जनक म्हणतात. बचत गट चळवळीला व्यापक रूप

देण्याचा प्रयत्न भारत सरकारच्या पुढाकारने सूरू झाला. स्वयंसहाय्यता बचतगट चळवळ आज ग्रामीण भागामध्ये उमेदीने वाटचाल करत आहे. भारतामध्ये स्वयंसहाय्यता बचतगट चळवळ म्हैसूर पुनर्निधारण आणि विकास एजन्सी My So Resettlement and Development Agencies (MYRADA) या संस्थेने १९८५ मध्ये सूरू केली आहे.[२] सन १९९३ मध्ये रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाच्या आदेशानुसार बचतगटाच्या अस्तित्वाला मान्यता मिळाली. रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाने सन १९९१ मध्ये सर्व व्यापारी बॅकांना आणि १९९३ मध्ये सहकारी बॅका व ग्रामीण बॅकांना बचतगट व बॅक जोडणीत सहभागी होण्याचे परिपत्रक काढले.[३] केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४ च्या आकडेवारीनूसार भारतात उमेदच्या खाली ८१ लाख बचत गट कार्यान्वीत आहेत. महाराष्ट्रात १९८४-८५ या काळात चंद्रपूर जिल्ह्यात वडसा तालुक्यात बचतगट सूरू झाल्याचे आढळने. महाराष्ट्रात बचतगट चळवळीच्या विकासात बॅका व स्वयंसेवी संस्थांचा मोठा वाटा आहे. स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजने पासून महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने बचत गट चळवळ आकार घेऊ लागली.

तक्ताक्र. १

महाराष्ट्रातील महिला स्वयंसहाय्यता गट

तपशिल	२०१८-१९	२०१९-२०	२०२०-२१
ग्रामीण	९५,३६८	९६,४४५	९८,०७४
नागरी	३१,०४०	३५,६९७	४२,९४४
एकूण	१,२६,४०८	१,३२,१२४	१,४१,०१८

(आधार- महाराष्ट्र शासन : आर्थिक सर्वेशन अहवाल २०१८-१९ व २०-२१)

मागील ३ वर्षात महाराष्ट्रातील महिला बचत गटांची संख्या वाढती राहिलेली आहे. ग्रामीण भागात शहरी भागापेक्षा अधिक महिला बचत गट आहेत. मात्र मागील ३ वर्षाचा विचार करता ग्रामीण भागापेक्षा नागरी भागातील महिला बचत गटांची संख्या झपाट्याने वाढत आहेत.

संशोधन निवडीचे महत्व :

प्रस्तूत संशोधन विषय निवडण्याचे मूख्य कारण म्हणजे वर्गनिहाय महिलांचे बचत गटातील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे व त्यांची साक्षरता मोजणे हे आहे. साक्षर महिलांचा बचत गटांकडे ओढा आढावा व निरक्षर महिलांना साक्षर करता यावे हा प्रस्तूत संशोधन विषय निवडण्यामागील उद्देश आहे.

संशोधन उदिष्ट्ये :

१. पींप्री राजाखूर्द गावातील एकूण महिला बचत गटांची वर्गनिहाय पाहणी करणे.

२. पींप्री राजाखूर्द येथील महिला बचत गटांतील महिलांची वर्गनिहाय शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.

संशोधन पध्दती :

संशोधनाचे उद्दिष्टे पूर्णकरण्यासाठी योग्य संशोधन पध्दतीचा वापर करणे अत्यंत गरजेचे असते. प्रस्तुत संशोधनासाठी खालील संशोधन पध्दती वापरली आहे.

- **नमूना निवड :**

प्रस्तूत संशोधनासाठी औरंगाबाद तालूक्यातील पींप्री राजाखूर्द या गावातील १६ महिला बचत गटांची नमूना म्हणून निवड करण्यात आली आहे.

१. प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तूत संशोधनासाठी महिला बचत गटांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांची माहिती घेण्यात आली आहे.

२. द्वितीयक स्त्रोत :

दुय्यम स्त्रोतात विविध तज्ञांचे संदर्भ पुस्तके, महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, वर्तमानपत्रे, संशोधनवर लेख यांचा अभ्यास करण्यात आला

बचत गटांची उद्दिष्ट्ये :

१. स्वयंसहाय्यता गटातील महिलांचा कौटुंबिक दर्जा वाढवणे
२. सर्व महिलांना बॅकींग व्यवहाराची माहिती करवूनदेणे.
३. गटातील सदस्यांना काटकसरीची व बचतीची सवय लावणे.
४. गटातील सदस्यांमध्ये स्वशक्ती व समूह शक्तीची जाणीव निर्माण करणे.
५. गटांतील सदस्यांना शिक्षण व विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देणे.
६. बचत गटांना कार्य करण्यासाठी शासनाच्या कोणताही नियम लागू पडत नाही, तर स्वनिर्मीत व इतर लवचिक नियमांचा अवलंब करून कार्याला गती दिली जाते.

महिला बचत गटांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा :

बचत गटाचे टिपण, खतावधी, सदस्य पासबूक व इतरदप्तर अद्यावत ठेवण्यासाठी महिला साक्षर असणे गरजेचे असते. त्यासाठी त्यांच्या साक्षरतेची स्थिती पुढील प्रमाणे.

तक्ता क्र. २

अ.क्र	जात (वर्ग)	निरक्षर	प्राथमिक शिक्षण	माध्यमिक शिक्षण	उच्च माध्यमिक शिक्षण	पदवी	एकूण
१	अनूसूचित जाती	३९.५%	१४.०%	३९.५%	२.३%	४.७%	१००%
२	इतर मागास प्रवर्ग	४०.९%	१८.२%	२२.७७%	१३.६%	४.५%	१००%

३	खुला	१५.६%	२५.६%	५०.०%	८.९%	०%	१००%
	एकूण	**२५.८%**	**२१.३७%**	**४३.२%**	**७.७%**	**१.९%**	**१००%**

वरील तक्तात महिलांच्या निरक्षरतेचे एकूण प्रमाण २५.८% आहे. त्यात इतर मागास प्रवर्गाचे प्रमाण ४०.९% अनुसूचित जातीचे प्रमाण ३९.५ % आहे. खूला प्रवर्गात हे प्रमाण इतरांच्या तूलनेत कमी म्हणजेच फक्त १५.६ %आहे. प्राथमिक शिक्षणाचा विचार करता सर्वाधिक प्रमाण खूला प्रवर्गात २५.६% आहे. तर अनूसूचित जातीत १४.० % आणि इतर मागास प्रवर्गात १८.२% आहे. एकूणात विचार करता सर्वाधिक प्रमाण माध्यमिक शिक्षणाचे आहे.ते ४३.२% इतके आहे. यात वर्गनिहाय सर्वाधिक प्रमाण खूला प्रवर्गाचे ५०.०% आहे.

तर अनूसूचित जातीचे प्रमाण ३९.५% आहे. उच्च माध्यमिक शिक्षणाचे सर्वाधिक प्रमाण इतर मागास प्रवर्गात १३.६% आहे. तरहे प्रमाण अनूसूचितजातीत अत्यंतकमी म्हणजेच २.३% आहे. पदवीचे शिक्षण घेण्याचे एकूण प्रमाण १.९% आहे. ज्यात अपवाद दिसून येतो की सर्वाधिक प्रमाण अनूसूचित जातीचे ४.७% आहे. अनूसूचित जाती व इतर मागास प्रवर्गात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याचे वरिल तक्तातून दिसून येते. तर शिक्षणाचा विचार करता सर्व वर्गातील महिलांमध्ये माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

निष्कर्ष :

१. वर्गनिहाय शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला असता त्यात तफावत दिसून येते.

२. निरक्षरतेचे प्रमाणजास्त आहे. त्यातहीते मागास प्रवर्गात जास्त आहे. हा चितेंचा विषय आहे.

३. माध्यमिक शिक्षणाचे प्रमाणजास्त असणे आनंददायी आहे.

४. उच्च माध्यमिक व पदवी शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आणि त्यात वर्गनिहाय तफावत दिसून येते.

शिफारशी :

१. अनूसूचित जाती व इतर मागास प्रवर्गाचे निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याने त्या वर्गातील साक्षर महिलांना महिला बचत गटांकडे आकर्षित करणे गरजेचे आहे.

२. बचत गटातील महिला लगेच जमा होऊ शकतात. त्यांना रात्र शाळेतून साक्षरतेचे धडे देण्यात यावे.

३. स्त्रीयांचा सामाजिक आर्थिक व राजकीय सबलीकरणाचा मार्ग सूकर होण्यासाठी शासनाने स्त्रीयांसाठी पारित करण्यात आलेले कायदे शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या अनेक योजना यासंबंधी माहिती ग्रामीण भागातील बचत गटातील स्त्रीयांपर्यंत पोहचण्याची व्यवस्था करावी.

संदर्भ:

१. काचोळे दा.धो. (१९९८), भारतीय धर्म, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृष्ठ क्र. ८

२. मूलाणी एम.यू. (२००८) अल्पबचत नियोजन (बचत गट) डायमंड पब्लिकेशन्स, पूणे. पृष्ठ क्र. १३,१६

३. चौधरी राजेश (२०११), महिला बचतगट हस्तपूस्तीका, चौधरी लॉ पब्लिशर्स पूणे. पृ.क्र. १९-३२

४. गोटे शूभांगी (२००४), महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन औरंगाबाद, पृ.क्र. १११

५. पाटील बा.भा. (२०१०), संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

६. Raheem Abdul (2011), Women Empowerment Though Through self help groups, Discovery Puvlishing House.

७. महाराष्ट्र शासनः आर्थिक पाहणी अहवाल (२०१८-१९ व २०१९-२०)

८. http:Aurangabad.zp.gov.in